५०

# महाराष्ट्र शासन

## आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय

जुने जकात घर, २ रा माळा, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ०२३

वाचले :- १) शासन अधिसुचना , गृहविभाग, क्र. बीपीए १०९१ / प्र. क्र. ५ / राऊशु - २, दिनांक ०८ सप्टेंबर २०१५.
२) शासन अधिसुचना , गृहविभाग, क्र. बीपीए १०९१ / प्र. क्र. ५ / राऊशु - २, दिनांक ०९ सप्टेंबर २०१५.
३) या कार्यालयाची अधिसूचना क्र. एमएलएस ११२०११/राकृस/चार, दिनांक २४ सप्टेंबर २०१५.

## प रि प त्र क

**विषय** — मळी / मद्यार्क यांचे उत्पादन , साठवणूक, वाहतूक व वाटप करताना येणा-या त्रृटीची मात्रा निश्चित करण्याकरिता नियमात दुरुस्ती बाबत.

क्रमांक – डिवायएस २०११/राकृस/चार

मुंबई, दिनांक ०७ नोव्हेंबर, २०१५.

महाराष्ट्र मद्यार्क आसवन व पेय मद्य निर्मिती नियम, १९६६ चा नियम १३ (३) नुसार किमान मद्यार्कांच्या उता-याचे प्रमाण २२० ब. लि. प्रति टन विहित केलेले आहे. याप्रमाणापेक्षा मद्यार्कांचा उतारा कमी आल्यास सदर नियमातील तरतुदीनुसार आयुक्तांना नमुना १२ मध्ये विवरणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तथापि, महालेखापाल यांनी आक्षेप नोंदविले होते की, मळीच्या नमुन्यात नमूद केलेल्या टिआरएस प्रमाणे प्रत्यंक्षात मद्यार्कांचे उत्पादन न होता कमी मद्यार्कांचे उत्पादन होते. या संदर्भात मळीपासून निर्मिती होणा-या मद्यार्कांबाबत तसेच मळीव्यतिरिक्त इतर पदार्थांपासून निर्मिती होणा-या मद्यार्कांच्या उता-याबाबत प्रमाण निश्चित करण्याच्या अनुषंगाने शासनाने सन २००२ मध्ये तत्कालीन आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली होती. समितीने केलेल्या शिफारशी शासनाने पत्र क्रमांक क्र. बीपीए १०९१ / प्र. क्र. ५ / राऊशु - २ , दि. १२/०२/२०१३ अन्वये स्विकारण्यास मान्यता दिली. सदर मान्यतेनुसार संबंधित अधिनियमांमध्ये उपरोक्त अनुक्रमांक १ ते ३ नुसार सुधारणा करण्यात आल्या आहेत. यासोबत अनुक्रमांक १ ते ३ च्या अधिसुचना पाठविण्यात येत आहेत. तरी अधिसूचनेच्या प्रती आपल्या कार्यक्षेत्रातील नमूना " I " अनुज्ञप्तीधारक व त्यावरील प्रभारी अधिकारी, नमुना एम-१ अनुज्ञप्ती धारक व कार्यक्षेत्रिय प्रभारी अधिकारी यांना पुरवाव्यात व त्याबाबतची पोच त्यांचेकडून प्राप्त करुन घेऊन ती अधीक्षकांनी त्यांच्या अभिलेखावर ठेवावी.

उपरोक्त अधिसुचनेच्या अनुषंगाने पुढे असे कळविण्यात येते की, मळीचे नमूने घेण्याबाबत वारंवारिता व सविस्तर कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे व त्याची जबाबदारी आसवनीच्या प्रभारी अधिकारी यांच्यावर निश्चित करण्यात आली आहे. सदर कार्यवाही करताना कोणत्याही प्रकारची त्रृटी राहु नये व नमुने घण्याची कार्यपध्दती समजून घेऊन कार्यवाही होणेआवश्यक आहे. त्यामुळे संबंधित प्रभारी अधिकारी यांना संबंधित विभागीय उपआयुक्त तसेच अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांनी पुढाकार घेऊन प्रशिक्षण देण्याबाबत कार्यवाही करावी.

विभागीय उप-आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, नाशिक विभाग, नाशिक यांचे कार्यालय
आवक क्र. ९४०३
दिनांक २९.११.२०१५
विभाग

२०.११.१५

F:\DESK - 4\RUPALI\O.S\Paripatrak of Adhisuchana.doc

यापूर्वी मद्यार्कांच्या उता-याची मात्रा मळीच्या टिआरएस नुसार निश्चित केलेली नव्हती परंतू उपरोक्त दि. ०८ सप्टेंबर २०१५ च्या अधिसूचनेनूसार मद्यार्काची मात्रा मळीमधील टिआरएसच्या प्रमाणानुसार निश्चित करण्यात आलेली आहे. त्यामुळे सप्टेंबर २०१५ पासून मद्यार्कांच्या उता-याचे प्रमाण निश्चित केल्याप्रमाणे येत आहे हे तपासण्याची दक्षता घेण्यात यावी. जर निश्चित केलेल्या मद्यार्कांच्या प्रमाणापेक्षा उतारा कमी असेल तर महाराष्ट्र मद्यार्क आसवन व पेय मद्य निर्मिती नियम – १९६६ चा नियम १३ (४) मधील तरतुदींनुसार अधीक्षकांमार्फत स्वयंस्पष्ट अभिप्राय व कारणमीमांसेसह अहवाल या कार्यालयास सादर करावे.

उपरोक्त नमुद केल्यानुसार मळीपासून प्राप्त होणा-या मद्यार्काचे प्रमाण टिआरएस नुसार निश्चित करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे असेही नमुद करण्यात येते की, मळीव्यतिरिक्त इतर पदार्थ जसे ज्वारी, बाजरी इ. धान्ये , बटाटा , साबुदाणा, उसाचा रस, काजूबोंडे इ. पदार्थांपासून देखील प्राप्त होणा-या मद्यार्कांच्या उता-याचे प्रमाण यापूर्वी निश्चित करण्यात आलेले नव्हते ते सप्टेंबर २०१५ पासून निश्चित करण्यात आले आहे. तरी सप्टेंबर २०१५ पासून अशाप्रकारे मळीव्यतिरिक्त इतर पदार्थांपासून प्राप्त होणा-या मद्यार्कांच्या उता-याच्या प्रमाणाबाबत देखील दक्षता घेण्यात यावी.

त्याचप्रमाणे मळी / मद्यार्काचे वजन करत असताना फक्त इलेक्ट्रॉनिक वजन काटयाचा वापर करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. तरी या सुचनांचे तंतोतंत पालन होत आहे याबाबत सर्वतोपरी दक्षता घेण्यात यावी. उपरोक्त नमुद केलेल्या दि. **२४ सप्टेंबर २०१५** च्या अधिसुचनेनुसार मळीची साठवणूक पूर्णपणे आच्छादित व गळती नसलेल्या स्टीलच्या टाकीखेरीज करता येणार नाही.

या परिपत्रकाची पोच सर्व अधीक्षकांनी दयावी.

( विजय सिंघल )
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

१) सर्व विभागीय उपआयुकत, राज्य उत्पादन शुल्क,
२) सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,
३) सर्व नमुना " I "अनुज्ञप्ती धारक (संबंधीत अधीक्षकांमार्फत).
४) सर्व नमुना " I "अनुज्ञप्ती वरील प्रभारी अधिकारी (संबंधीत अधीक्षकांमार्फत).
५) सर्व नमुना एम-१ अनुज्ञप्ती धारक (संबंधीत अधीक्षकांमार्फत).
६) या कार्यालयातील सर्व राजपत्रित /अराजपत्रित अधिकारी.
७) या कार्यालयातील सर्व कार्यासन अधिकारी.
८) अभिलेख शाखा ( ५ प्रती ).

प्रत,

मा. प्रधानसचिव, गृहविभाग (रा. ऊ. शु.), महाराष्ट्र शासन यांना माहितीस्तव सादर.